
## प्रस्तावना :

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. लोकांच्या संघटित प्रयत्नामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला एक वेगळा दर्जा प्राप्त झाला आहे.




## महाराष्ट्राचे प्रशासकीय विभाग :

महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण पाहणी २०१७-१८ च्या अहवालानुसार, महाराष्ट्र राज्याचे प्रशासकीय कारणांसाठी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर असे सहा महसूल विभाग असून त्यामध्ये ३६ जिल्हे समाविष्ट आहेत.

## महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये :

१) महाराष्ट्र हे देशात दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले राज्य आहे. राज्याची लोकसंख्या २०११ मध्ये ११.२४ कोटी होती.

२) महाराष्ट्र राज्य भौगोलिकदृष्ट्या देशातील तिसरे मोठे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ३.०८ लाख चौ.किमी. आहे.

३) महाराष्ट्र हे नागरीकरण झालेले राज्य असून ४५.२०% लोकसंख्या नागरी भागात राहात आहे.

४) जनगणना २०११ च्या अहवालानुसार महाराष्ट्रातील लिंग-गुणोत्तर प्रमाण दरहजारी पुरुषांमागे ९२९ स्त्रिया इतके आहे.

५) २०११ च्या जनगणनेनुसार राज्याचा साक्षरता दर ८२.३% होता.

६) महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१६-१७ नुसार इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे स्थूल राज्यांतर्गत उत्पादन (GSDP) आणि दरडोई उत्पन्न (SPCI) सर्वाधिक आहे.

७) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे

i) विपुल नैसर्गिक साधन संपत्ती.
ii) कुशल मनुष्यबळाची उपलब्धता.
iii) अद्ययावत तांत्रिक सुधारणा.
iv) विकसित पायाभूत सुविधा.

८) महाराष्ट्र हे नवनिर्मिती, कौशल्यविकास, गुंतवणूक व पर्यटन यांसाठी लोकप्रिय आहे.

**महाराष्ट्राचा आर्थिक विकास :**




आकृती ४.१ : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

**अ) कृषी क्षेत्र :** कृषी क्षेत्र व संलग्न क्षेत्र राज्याच्या आर्थिक विकासामध्ये प्रमुख भूमिका पार पाडतात. महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षणानुसार कृषी व संलग्न क्षेत्रातील राज्याचे एकूण उत्पादनाचे मूल्यवर्धित प्रमाण २००१-२००२ मध्ये १५.३ टक्के इतके होते. या तुलनेत २०१६-१७ मध्ये हे प्रमाण १२.२ टक्के इतके कमी झाल्याचे दिसून येते.



आकृती ४.२ : कृषी

**कृषी क्षेत्रातील सर्वसाधारण समस्या :**

i) जमीनधारणेचा कमी आकार व कमी उत्पादकता.
ii) सीमांत अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ.
iii) रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अति वापरामुळे शेतजमिनीची अवनती.
iv) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा
v) भू-सुधारणा कायदा व पीक पद्धती यांची सदोष अंमलबजावणी
vi) कोरडवाहू जमीन आणि जलसिंचन सुविधांचा अभाव.
vii) भांडवलाची कमतरता
viii) ग्रामीण विकास योजनांची अयोग्य अंमलबजावणी.
ix) विपणन व्यवस्थेची कमतरता
x) हवामान बदलांचा परिणाम.

**याचा विचार करा :**

शेतकऱ्याने आपला माल मध्यस्थाशिवाय थेट ग्राहकांना विकल्यास काय होईल?

**महाराष्ट्र आर्थिक पहाणी २०१७-१८ नुसार कृषिक्षेत्राच्या विकासासाठी सरकारने केलेल्या उपाययोजना :**

१) वाजवी दरात दर्जेदार बी-बियाणांचे वितरण.
२) खते व कीटकनाशकांच्या वितरण केंद्रात झालेली वाढ.
३) जलसिंचन सोयींचा विकास.
४) शेती पंपांचे विद्युतीकरण व मागणीनुसार वीजपुरवठा.
५) आवश्यकतेनुसार पतपुरवठा.
६) कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC), कृषी उत्पादन निर्यात क्षेत्रे, फलोत्पादन प्रशिक्षण केंद्र, प्रभावी वितरणासाठी श्रेणीकरण व बांधणी सुविधांची उपलब्धतता.
७) प्रसार माध्यमांच्या द्वारे कृषिविषयक माहितीचा प्रसार करून कृषी व्यवसाय हा नफा देणारा व्यवसाय आहे अशा दृष्टिकोनाची निर्मिती.

**ब) उद्योग क्षेत्र :** महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य आहे. वार्षिक औद्योगिक पाहणी (ASI)

२०१६-१७ नुसार महाराष्ट्र हे आद्योगिक क्षेत्रात अग्रेसर आहे. महाराष्ट्राच्या तसेच देशाच्या आर्थिक विकासात राज्याच्या औद्योगिक क्षेत्राचा मोठा वाटा आहे. उद्योग क्षेत्रामध्ये शेती क्षेत्रातील अतिरिक्त कामगार सामावून घेण्याची क्षमता आहे. यामुळे बाजारांमध्ये विविधता, उच्च उत्पन्न व उच्च उत्पादकता निर्माण होते. भारताच्या निव्वळ मूल्य जमा वर्धित (NVA) उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे १८% आहे. प्रादेशिक व विदेशी गुंतवणूकदार महाराष्ट्रातील उद्योगात गुंतवणूक करण्यास प्राध्यान्य देतात.



आकृती ४.३ : उद्योग

**शोधा पाहू :**

महाराष्ट्रातील खालील उत्पादन क्षेत्रांसाठी असणाऱ्या प्रत्येकी पाच उद्योगांची नावे शोधा. उदा. रसायने, अन्नप्रक्रिया, कापडनिर्मिती, माहितीतंत्र, औषध निर्मिती.

### प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक (FDI) :

१९९० च्या सुरुवातीस भारत सरकारने विशिष्ट क्षेत्रात प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक आणण्यास सुरुवात केली. १९९१ च्या उदारीकरणाच्या कायद्याने प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला. भारतात महाराष्ट्र हे गुंतवणुकीबाबत पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्य हे प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीबाबतीत (FDI) अग्रेसर आहे. प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण एप्रिल २००० पासून सप्टेंबर २०१७ पर्यंत ₹ ६,११,७६० कोटी इतके होते. हे प्रमाण भारतातील एकूण प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीच्या ३१% आहे.

### औद्योगिक क्षेत्रातील सर्वसाधारण समस्या :

१) शासकीय दफ्तर दिरंगाई
२) कौशल्य विकासाच्या संधींची कमतरता
३) सुधारित तंत्रज्ञानाचा अभाव.
४) पायाभूत सुविधांचा अभाव.
५) नवीन उद्योजकांना प्रोत्साहनांचा अभाव
६) विकास कार्यक्रमांचा अभाव
७) प्रादेशिक असमतोल

### महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८ नुसार औद्योगिक विकासाकरिता सरकारने केलेल्या उपाययोजना :

१) संभाव्य गुंतवणूकदारांना सर्व प्रकारच्या मान्यता देण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्यात आली.

२) महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा केंद्रामार्फत (MAITRI) - गुंतवणूकदारांना आवश्यक असलेल्या सुविधा व माहिती पुरविली जाते.

३) लघु उद्योगांचा आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात सहभाग वाढावा म्हणून निर्यातीस प्रोत्साहन व जागेच्या भाड्यासाठी अनुदानाची उपलब्धतता करून दिली.

४) औद्योगिक वृद्धीसाठी विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) निर्मिती करण्यात आली.

५) महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रम (MSICDP) लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योजकांसाठी सुरू करण्यात आला.

**क) सेवा क्षेत्र :** या क्षेत्रात विमा, पर्यटन, बँकिंग,शिक्षण व सामाजिक सेवा इत्यादींचा समावेश होतो, तसेच व्यावसायिक सेवा व अंतिम ग्राहक सेवा यांचाही समावेश होतो.

सेवा क्षेत्र हे मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविणारे व वेगाने वाढणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचे योगदान मोठे आहे. इतर क्षेत्राच्या तुलनेत स्थूल राज्यांतर्गत उत्पादनात (GSDP) सेवा क्षेत्राचे योगदान, सर्वांत जास्त असून २०१७-१८ मध्ये ५४.५% इतके होते.

सेवा क्षेत्राच्या वाढीस चालना देणारे काही प्रमुख उद्योग आहेत त्या मध्ये प्रामुख्याने अर्थतंत्र, माहिती तंत्र IT/ITES, स्टार्टअप्स, क्लाऊड कॉम्प्युटींग, वीजे वरील वाहने, संरक्षण, पर्यटन व खाजगी विद्यापीठे होय. शासनातर्फे सेवा क्षेत्रातील वाढ द्विवितीय श्रेणीच्या शहरामध्येही करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतलेले आहेत.

**करून पहा :**


मागील परिच्छेदातील सेवांचे वर्गीकरण व्यावसायिक व अंतिम ग्राहक सेवांमध्ये करा.

## सेवा क्षेत्राचे मुख्य घटक :

- **पायाभूत संरचना :**

आर्थिक विकासासाठी पायाभूत सुविधा या अत्यंत गरजेच्या आहेत. सशक्त पायाभूत सुविधा या राज्याच्या सामाजिक आर्थिक विकासाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत अधिक गुंतवणूकदार आकर्षित होऊन स्पर्धात्मक वातावरणाची निर्मिती होते. पुरेशा पायाभूत सुविधा या वेगवान व शाश्वत आर्थिक वृद्धीसाठी अत्यंत गरजेच्या आहेत.

**पायाभूत सुविधांचे वर्गीकरण**




**अ) आर्थिक पायाभूत सुविधा :** आर्थिक पायाभूत सुविधांमुळे विकासासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन व वितरण करणे सोयीचे होते.

### आर्थिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजलेले उपाय :

१) वीजनिर्मितीची क्षमता वाढविणे.

२) ग्रामीण विद्युतीकरण, नेटवर्क सुधारणा, ऊर्जा संवर्धनासाठी कार्यक्रम.

३) राज्यातील ग्राहकांना सुधारित एल.पी.जी. गॅस योजनांचा थेट लाभ.

४) राज्यात रस्ता विकास योजनेची (२००१-२०२१) अंमलबजावणी झाली असून ३.३ लाख कि. मी. रस्ते विकसित करणे हे या योजनेचे लक्ष्य आहे.

५) मुंबई, नागपूर येथे मेट्रो रेल्वे सुरू झाली आहे.

६) बंदरांच्या सर्वांगीण विकासाकरिता महाराष्ट्र बंदर विकास धोरण सुरू करण्यात आले. या धोरणांतर्गत केंद्रशासनाच्या सागरमाला कार्यक्रमाला प्रोत्साहन दिले आहे.

७) ३० सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्रात नोंदणीकृत इंटरनेट ग्राहकांची संख्या ५.४५ कोटी इतकी असून हे प्रमाण इतर राज्यापेक्षा सर्वाधिक आहे.

**ब) सामाजिक पायाभूत सुविधा :**

सामाजिक पायाभूत सुविधा हा अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे कारण मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच आर्थिक विकासाला गती देण्यासाठी त्याची आवश्यकता असते. केवळ दर्जा सुधारणेच नव्हे तर ज्ञानसंवर्धनासाठीही त्यांची गरज असते. सामाजिक पायाभूत सुविधांतर्गत साक्षरता अभियान कार्यक्रम, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, गृहनिर्माण, पिण्याचा पाण्याचा पुरवठा आणि स्वच्छता सुविधा इत्यादींचा समावेश होतो.

### सामाजिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी योजलेले उपाय :



**१) शिक्षण :**

शिक्षण ही मानवाची मूलभूत गरज आहे. कुठल्याही देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा शिक्षण हा कणा आहे. तसेच मानवी संसाधनाच्या विकासासाठी (HRD) तो आत्यंतिक महत्त्वाचा घटक आहे. सद्यस्थितीत भारतात तरुणांची संख्या सर्वाधिक आहे. लोकसंख्येच्या ह्या लाभांशामुळे शिक्षणाला प्राधान्य देणे राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर गरजेचे ठरते. भारतात शिक्षणाचे चार स्तर आहेत.

१) प्राथमिक २) माध्यमिक

३) उच्च माध्यमिक ४) उच्च शिक्षण

**अ) प्राथमिक शिक्षण :** महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्र सरकारच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत (SSA) ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार (RTE) प्रदान केला आहे. २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्राथमिक शिक्षणावरील राज्य सरकारचा खर्च ₹ १९,४८६ कोटी इतका होता.

**प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ली ते ८ वी) शैक्षणिक संस्था व नोंदणी**

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण नोंदणी (लाखात) | शिक्षक संख्या (लाखात) | शिक्षक विद्यार्थी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | १०,४९७१ | १५९.८६ | ५.३० | ३०:१ |

**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८

**ब) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण :** माध्यमिक शिक्षणाचा दर्जा सुधारावा तसेच प्रवेश संख्या वाढावी या उद्देशाने राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची (RMSA) सुरुवात २००९ मध्ये करण्यात आली. २०१६-१७ मध्ये राज्य सरकारचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणावरील खर्च ₹ १६,०८९ कोटी इतका होता.

**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण (इयत्ता ९ वी ते १२ वी) शैक्षणिक संस्था व नोंदणी**

| वर्ष | शाळांची संख्या | एकूण नोंदणी (लाखात) | शिक्षक संख्या (लाखात) | शिक्षक विद्यार्थी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१६-१७ | २५,७३७ | ६६.१५ | २.१३ | ३१:१ |

**संदर्भ :** महाराष्ट्र आर्थिक पाहणी २०१७-१८

**क) उच्च शिक्षण :** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा बरोबरच महाराष्ट्र सरकार उच्च शिक्षणाच्या संधी विस्तारण्यासाठी प्रयत्नशील आहे. उच्च शिक्षणामुळे सुधारीत तंत्र व कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीसाठी मदत झाली आहे. उच्च शिक्षण देण्यासाठी २२ विद्यापीठे असून त्यांपैकी ४ कृषी विद्यापीठे, १ आरोग्यविज्ञान विद्यापीठ, पशु- वैद्यकीय विद्यापीठ, १ तंत्रज्ञान विद्यापीठ व १५ सामान्य विद्यापीठे आहेत. याशिवाय २१ अभिमत विद्यापीठे, १ केंद्रीय विद्यापीठ, ४ खाजगी अभिमत विद्यापीठे व राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या महत्त्वाच्या ५ संस्था राज्यात आहेत.

राज्याने उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणाची आव्हाने पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ अधिनियमित केला. उच्च शिक्षणात लोकशाही तत्वाचा वापर करून शैक्षणिक स्वायत्तता, गुणवत्तापूर्ण व कौशल्याधिष्ठित शिक्षण यांचा समावेश करणे हे या कायद्याचे प्रमुख ध्येय आहे.

राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत संशोधन, नवोपक्रम, गुणवत्तापूर्ण सुधारणा, नवोन्मेष व आधुनिक तंत्र संकुलाची स्थापना यासाठी २० कोटी रूपयांचे अनुदान मिळविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. भारत सरकारने २०१३ साली उच्चतत्तर शिक्षा अभियान (RUSA) सुरू केले.

**ड) इतर :**

**१) सर्वसमावेशक शिक्षण :** विशेष गरजांची तरतूद व गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विशेष दिव्यांगासाठी सर्वसमावेशक कार्यक्रमाची राज्य सरकारने अंमलबजावणी केली.

**२) मुलींचे शिक्षण :** मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणून उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मोफत शिक्षण, ग्रामीण भागातील मुलींना एस.टी. प्रवास मोफत सेवा, शाळेपासून ५ किलोमीटर अंतरापर्यंत राहणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप यांसारख्या योजना महाराष्ट्र शासनाने राबविल्या आहेत.

**३) प्रौढ साक्षरता :** प्रौढ साक्षरता वाढावी म्हणून प्रत्येकासाठी शिक्षण, साक्षर भारत अभियान यांसारख्या योजना लोकांच्या सहभागातून राज्य सरकारच्या पुढाकाराने राबविण्यात आल्या.

**४) आदिवासींचे शिक्षण :** राज्याचा कक्षेत येणाऱ्या आदिवासी क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने निवासी आश्रम शाळा सुरू केल्या. आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत निवासाची सुविधा, आहार, गणवेश, शैक्षणिक साहित्य आणि अन्य सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात सध्या ५५६ अनुदानीत आश्रम शाळा आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे म्हणून सरकारने विभागीय, जिल्हा व तालुका पातळीवर वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**शोधा पाहू :**

खालील अभियानाची सांकेतिक चिन्हे (Symbol)

- सर्व शिक्षा अभियान - SSA
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान - RMSA
- प्रौढ साक्षरता अभियान - ALM

### २) आरोग्य सेवा :

३१ मार्च २०१७ पर्यंत महाराष्ट्रामध्ये एकूण १८१४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३६० सार्वजनिक आरोग्य केंद्रे होती. महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) आणि राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यावर भर दिला. या कार्यक्रमांतर्गत सुरक्षित

पेयजल, पोषक आहार, आरोग्य आणि स्वच्छता या बाबींवर सर्वांत जास्त भर दिला आहे. महाराष्ट्र सरकारने व्यापक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी त्रिस्तरीय पायाभूत सुविधांची निर्मिती केली.

प्राथमिक स्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्रे व सार्वजनिक आरोग्य केंद्र. दुय्यम स्तरावर उपजिल्हा रुग्णालये व जिल्हा रुग्णालय यांचा समावेश असतो.

तृतीय स्तरावर सुसज्ज वैद्यकीय महाविद्यालये व प्रमुख शहरांतील सुपर स्पेशॅलिटी दवाखाने इत्यादींचा समावेश होतो.

### • पर्यटन :

महाराष्ट्रात वेगवेगळ्या राज्यातून पर्यटक व विदेशी पर्यटक आकर्षित होतात. महाराष्ट्रात पर्यटनाचा विकास व्हावा म्हणून राज्य सरकारने महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०१६ अंमलात आणले.

**पर्यटन धोरणात खालील उदि्दष्टांचा समावेश होतो :**

- २०२५ पर्यंत महाराष्ट्राला अग्रगण्य पर्यटन स्थळ बनिवणे.
- पर्यटनातील गुंतवणूकदारांना आकर्षित करून ₹ ३०,००० कोटीपर्यंत रक्कम वाढविणे.
- पर्यटन उद्योगामध्ये दहा लाख अधिक रोजगारांची निर्मिती करणे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही एक नोडल संस्था असून ती या धोरणाची अंमलबजावणी करते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) विविध कार्यक्रम आयोजित करते उदा. वेरूळ महोत्सव (एलोरा फेस्टिवल), घारापुरी महोत्सव (एलीफंटा फेस्टीवल) इत्यादी.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडून (MTDC) 'महाभ्रमण' ही योजना कार्यान्वीत करण्यात आली. या अंतर्गत कृषी पर्यटन, ग्रामीण पर्यटन, अन्न पर्यटन, वन विहार, आदिवासी जीवनशैली इत्यादी प्रकल्प एकाच अधिपत्याखाली राबविले जातात.

### • आतिथ्य सेवा :

आतिथ्य सेवा उद्योग हा इतर उद्योगांपेक्षा खूप विस्तारित आहे. महाराष्ट्रात आतिथ्य सेवा झपाट्याने वाढण्याचे कारण पर्यटन क्षेत्रात होणारी वाढ हे आहे. ह्या उद्योगाचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे ग्राहकाचे समाधान. उपहारगृह हे आतिथ्य उद्योगाचा एक भाग असून पर्यटकांना वाहतुकीची सेवा पुरवतात. तसेच हवाई प्रवास, जलप्रवास मुंबई-गोवा (क्रूझशीप), आरामदायी आणि अलिशान रेल्वे प्रवास (डेक्कन ओडिशी), उपहार गृह, सामान्य पर्यटन व कार्यक्रमांचे व्यवस्थापन इत्यादी सेवा पुरवितात.

### • मनोरंजन उद्योग :

जगाच्या तुलनेत भारतामध्ये सर्वांत जास्त चित्रपट निर्मिती केली जाते. यात महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आहे. महाराष्ट्रातील मनोरंजन क्षेत्र अनेकांना रोजगार संधी उपलब्ध करून देते. कोल्हापूर हे शहर विशेष प्रादेशिक सिनेमासाठी प्रसिध्द आहे. जागतिक सिनेमा उद्योगात मुंबई 'बॉलिवूड' म्हणून प्रसिद्ध असलेले शहर आहे.

### महाराष्ट्रातील सहकार चळवळ :

सहकार चळवळ हे महाराष्ट्राने देशाला दिलेले एक मोठे योगदान आहे.



आकृती ४.४ : सहकार चळवळ

महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सहकार चळवळ हे एक प्रभावी साधन आहे. सहकारी संस्थांची प्रमुख तत्त्वे ही स्वयंसहाय्यता, लोकशाही, समता व एकता इत्यादींना प्रोत्साहन देणारी आहेत.

सुरुवातीला महाराष्ट्रात सहकार चळवळ ही मुख्यत्वे कृषी क्षेत्रातील पतपुरवठ्यापर्यंत मर्यादित होती, परंतु नंतर इतर क्षेत्रातही या चळवळीचा विस्तार झाला. उदा.

- कृषी प्रक्रिया
- कृषी विपणन
- सहकारी साखर कारखाने
- मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था
- सहकारी दूध उत्पादक संस्था
- कापड उद्योग

- गृहनिर्माण सहकारी संस्था
- ग्राहक भांडारे

३१ मार्च २०१७ नुसार राज्यात १.९५ लाख सहकारी संस्था असून त्यांचे ५.२५ लाख सभासद आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १. अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द सांगा :**

१) परकीय/विदेशी कंपन्यांनी आपल्या देशात केलेली गुंतवणूक

२) लघु, मध्यम आणि सूक्ष्म उद्योजकांसाठी सुरू करण्यात आलेला विकास कार्यक्रम.

३) आर्थिक विकासासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन व विभाजन सुलभ करणे.

४) स्वयंसाहाय्यतेचे मूल्य प्रोत्साहित करणे, लोकशाही, समता आणि एकता जपणे.

**प्र.२. विसंगत शब्द ओळखा :**

१) शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, कोरडवाहू जमीन, भांडवलाची कमतरता, अभियांत्रिकी.

२) पर्यटन, बँकिंग, वाहन उत्पादन, विमा.

३) पुणे, हैद्राबाद, नाशिक, नागपूर.

४) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC), महाराष्ट्र उद्योग व्यापार व गुंतवणूक सुलभ केंद्र (MAITRI), विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC).

५) प्राथमिक शिक्षण, आतिथ्य सेवा, उच्च शिक्षण, कौशल्यधिष्ठित शिक्षण.

**प्र.३. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा :**

१) यंत्रमानव तंत्रातील संशोधनासाठी जपानने भारतात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.

२) प्राजक्ता व तिचे कुटुंब दिवाळीच्या सुट्टीत आठ दिवस समुद्र किनारी फिरण्यासाठी गेले.

३) लातूरचा प्रविण मुंबई येथे चित्रपटसृष्टीत तंत्रज्ञ म्हणून काम करतो.

४) चंद्रपूरची राणीगोंद ही मुंबई-गोवा जहाजावर (क्रुझशीप) जहाजसुंदरी म्हणून काम करते.

**प्र.४. फरक स्पष्ट करा :**

१) आर्थिक पायाभूत सुविधा आणि सामाजिक पायाभूत सुविधा.

२) शेती क्षेत्र आणि सेवा क्षेत्र.

३) पर्यटन आणि आतिथ्य सेवा.

४) शिक्षण आणि आरोग्य सेवा.

**प्र. ५. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

१) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची भूमिका स्पष्ट करा.

२) महाराष्ट्रातील कृषीक्षेत्राच्या विकासासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

३) महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रातील समस्या स्पष्ट करा.

४) महाराष्ट्रातील सामाजिक पायाभूत सुविधांमधील विकासासाठी महाराष्ट्र शासनाने केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

**प्र. ६. खालील उतारा वाचून काळजीपूर्वक खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

आधुनिक युगाची कास धरत देशातील ग्रामीण भाग हायस्पीड ब्रॉडबँड इंटरनेट सेवेच्या माध्यमातून जोडण्यासाठी केंद्र शासनाने 'भारतनेट' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. देशातील एक लाखाहून अधिक ग्रामपंचायती 'भारतनेट' च्या पहिल्या टप्प्यात हायस्पीड ब्रॉडबँडव्दारे जोडण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायतींना हायस्पीड ब्रॉडबँडव्दारे जोडण्याच्या कामात महाराष्ट्र उत्कृष्ट राज्य ठरले आहे. १२ हजार ३७८ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्राबरोबर उत्तरप्रदेश (पूर्व), मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि झारखंड ही राज्येसुध्दा भारत नेटच्या पहिल्या टप्प्यात उत्कृष्ट ठरली आहेत.

१) केंद्र शासनाने 'भारतनेट' हा कार्यक्रम का हाती घेतला?

२) देशातील किती ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे?

३) महाराष्ट्राशिवाय इतर कोणती राज्ये भारतनेट मध्ये उत्कृष्ट ठरली आहेत?

४) 'इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे' याबद्दल तुमचे मत सांगा.